SHREEMATI NATHIBAI DAMODAR THACKERSEY
# WOMEN'S UNIVERSITY
Pariksha Bhavan, Sir Vithaldas Thackersey Vidyavihar,
Juhu Road, Santacruz (West), Mumbai-400 049.
www.sndt.ac.in, E-mail: doee@sndt.ac.in; drexam@sndt.ac.in,
E-mail : drexam1@sndt.ac.in, arexam@sndt.ac.in

DOEE (D) : 2661 5159
Dy. Registrar : 2661 1524
Dy. Registrar 1 : 2660 3259
Asst. Registrar : 2661 5138
B.Ed, H.Sc, Nsg. DMLT : 2660 3322
B.A., B.Com., M.A., M.Com, Law : 2661 1595
Accounts : 2660 8374
Degree, Migm, Certi. : 2661 2877
M.Phil. Ph.D : 2660 3259
Confidential : 2661 2265
Tech., Pharma., BCA, BMS : 2661 5985
CFC : 2660 8304 / 2661 5168

संदर्भ:परीक्षा/प.शु.मा./२०१९—२०/३३३ दिनांक:२५/११/२०१९

प्रति,

१. विद्यापीठ विभाग प्रमुख, चर्चगेट, जुहू आणि पुणे परिसर,

२. प्राचार्य, विद्यापीठाशी संलग्नीत व संचलित महाविद्यालये.

**विषय: दुष्काळ परिस्थिती तसेच "क्यार" व "महा" चक्रिवादळामुळे आलेल्या अवेळी पावसामुळे नुकसान झालेल्या तालुक्यातील महाविद्यालयीन विद्यार्थिनींचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत.**

संदर्भ: १. शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय. क्र.एफईडी—१५९२/१२०२/(११३२)/साशि—५, दिनांक १८/१०/१९९३.

२. महसुल व वन विभाग, शासन निणर्य, क्र.एससीवाय—२०१९/प्र. क्र.२२०/म—७, दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१९.

३. महसुल व वन विभाग, शासन निणर्य, क्र.सीएएस—२०१९/प्र. क्र.१९१/म—३, दिनांक १८ नोव्हेंबर, २०१९.

४. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्र.शुल्क—५२१९/प्र. क्र.३११/मशि—२, दिनांक २१ नोव्हेंबर, २०१९.

५. उच्च शिक्षण संचलनालय (उच्च शिक्षण) यांचे परिपत्रक क्र.उशिसं—२०१९/परीक्षा शुल्क/शिष्यवृत्ती/१५१५६ दिनांक: २२ नोव्हेंबर, २०१९.

महोदय / महोदया,

उपरोक्त संदर्भ क्रमांक—५ च्या शिक्षण संचलनालयाच्या परिपत्रकान्वये कळविण्यात आलेले आहे की, संदर्भ क्रमांक—१ येथील शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्यातील टंचाई ग्रस्त भागातील विद्यार्थिनींची विद्यापीठ परीक्षा फी माफ करण्याची योजना लागु केलेली आहे. त्यामध्ये अकृषी विद्यापीठाकडून घेण्यात येणाऱ्या परीक्षांचा समावेश आहे. तसेच, महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाने संदर्भाधिन क्रमांक.२ येथील शासन निर्णयान्वये जून ते सप्टेंबर, २०१९ या कालावधीत पर्जन्य तुट व अनुषंगिक बाबींमुळे प्रभावित झालेल्या अंबेजोगाई, जिल्हा. बीड व परांडा, जिल्हा. उस्मानाबाद या दोन तालुक्यामध्ये दुष्काळ घोषित करून काही सवलती लागु केलेल्या आहेत. तसेच संदर्भाधिन क्रमांक—३ येथील शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्यात माहे

ऑक्टोंबर–नोव्हेंबर, २०१९ मध्ये "क्यार" व "महा" चक्रिवादळामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे झालेल्या अवेळी पावसामुळे राज्यातील ३४ जिल्हयातील ३२५ तालुक्यांमध्ये शेतीपिकांचे व बहुवार्षिक पिकांचे नुकसान झालेल्या आपदग्रस्त शेतकऱ्यांना मदत व सवलतींमध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याची सवलत लागू केलेली आहे. यास्तव सदर दुष्काळी परिस्थिती व आपतग्रस्त तालुक्यांमधील महाविद्यालयीन विद्यार्थांचे परीक्षा माफीसंबंधी संदर्भाधिन क्रमांक–१ येथील शासन निर्णयातील तरतुदीनुसार तात्काळ कार्यवाही करावयाची आहे. त्यानुसार एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठाच्या संचलित व संलग्नित आपल्या अधिनस्त विद्यापीठ / महाविद्यालयांना खालीलप्रमाणे सुचना देण्यात याव्यात.

१. संदर्भ क्रमांक–१ येथील १८ ऑक्टोंबर, १९९३ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ८ मध्ये नमुद केल्याप्रमाणे दुष्काळ घोषित केलेल्या तालुक्यातील विद्यार्थ्यी व सवलतीस पात्र असणारे शेतीपीकांच्या नुकसान झालेल्या शेतकऱ्यांचे पाल्य यांच्याकडून महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी परीक्षा फी न घेता त्यांचे आवेदनपत्रे विद्यापीठाकडे संदर्भ क्रमांक–१ च्या शासन निर्णयात नमूद केलेल्या प्रमाणपत्रावर साक्षांकित करून पाठवावे.

२. सद्यस्थितीत विद्यापीठाचे पहिले शैक्षणिक सत्र संपलेले असल्याने महाविद्यालयात दुष्काळ घोषित केलेल्या तालुक्यातील पात्र विद्यार्थ्यी व शेतीपीकांच्या नुकसान झालेल्या शेतकऱ्यांचे पाल्य शिक्षण घेत असल्यास सदर लाभार्थ्यांना परीक्षा शुल्कापोटी भरलेल्या रकमेची प्रतिपुर्ती करण्यासाठी विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, विद्यापीठ / महाविद्यालये यांच्याकडून माहिती संकलीत करून व रक्कम परिगणना करून रकमेचा प्रस्ताव उच्च शिक्षण संचालनालयास सादर करणार आहेत.

३. विभागीय सहसेचालक, उच्च शिक्षण, महाविद्यालयाकडून / विद्यापीठाकडून आलेल्या माहितीची तपासणी करून आवश्यक रकमेची माहिती उच्च शिक्षण संचालनालयाकडे सोबतच्या विवरणपत्र–अ,ब,क,ड मध्ये सादर करणार आहेत. सदरची माहिती सादर केल्यानंतर संचालक उच्च शिक्षण कार्यालयांना सदर योजनेसाठी रक्कम शासनाकडून उपलब्ध करून देण्यात येणार आहे व सहसंचालक स्तरावरून संबंधित रकमेची प्रतिपुर्ती करण्यात येणार आहे.

४. कोणत्याही परिस्थीतीत दुष्काळ घोषित केलेल्या तालुक्यातील विद्यार्थ्यी व सवलतीस पात्र असणारे शेतीपीकांच्या नुकसान झालेल्या शेतकऱ्यांचे पाल्य सदर योजनेपासुन वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

५. ही परीक्षा शुल्क माफीची योजना राज्याचा अधिवास असलेल्या व रूपये ८.०० लाख या मर्यादेपर्यंत कुटुंबाची वार्षिक उत्पन्न मर्यादा असलेल्या. दुष्काळ घोषित केलेल्या तालुक्यातील विद्यार्थ्यी व सवलतीस पात्र असणारे शेतीपीकांच्या नुकसान झालेल्या शेतकऱ्यांचे पाल्य यांना लागू राहील.

६. ही सवलत खालील विद्यार्थ्यांना लागू असणार नाही—

अ. ज्या विद्यार्थ्यांना शासनाच्या अन्य शैक्षणिक सवलतीनुसार १०० टक्के परीक्षा शुल्क माफीची सवलत उपलब्ध आहे.

ब. जे विद्यार्थी त्याच परीक्षेस दुसऱ्यांदा बसले असतील.

क. जे विद्यार्थी बहिस्थ म्हणून नोंदले असतील.

ड. ज्या विद्यार्थ्यांचे पालक शहरात प्रत्यक्ष राहतात, नोकरी—धंदा करतात, परंतु त्यांच्या नांवे गावी शेत जमिन आहे अशा विद्यार्थ्यांना.

ऑक्टोबर २०१९ मधील अवेळी पावसामुळे मोठया प्रमाणात पिकांचे नुकसानीमुळे बाधित झालेल्या तालुक्यांची नावांची यादी व विवरणपत्र — अ, ब, क आणि ड सोबत जोडली आहे.

उपरोक्त आवश्यक असलेली माहिती विवरणपत्र — अ, ब, क, ड मध्ये विद्यापीठास दि.२० डिसेंबर, २०१९ पर्यंत विनाविलंब सादर करावी, ही विनंती.

कळावे.

आपला विश्वासू,

24/11/19

(डॉ. सूभाष वाघमारे)
संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

प्रत माहीतीस्तव सादर —

१. मा. कुलगुरू यांचे कार्यालय,
२. मा. प्रकुलगुरू यांचे कार्यालय,
३. मा. अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान,
४. मा. कुलसचिव,
५. मा. वित व लेखा अधिकारी (अति. कार्यभार),
६. संबंधित उपकुलसचिव / सहाय्यक सचिव / सहाय्यक वित व लेखा अधिकारी.